# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १८–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. सदाशिव निंगाप्पा तेली,<br>मु.पो. कोत्येंन बोबलाद, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सदाशिव निंगाप्पा तेली, मु.पो. कोत्येंन बोबलाद,ता. जत, जि. सांगली यांनी शेतीपंप विद्युत पुरवठा मिळावा यासाठी वि.प.कडे दिनांक ८.१२.२००९ ला अर्ज केला व त्यासाठी भरावी लागणारी फी रु.५०/– पोष्टाच्या मनीऑर्डरने पाठविली. प्रस्तुतचा अर्ज हा ३ एच.पी. वीज कनेक्शनसाठी असून गट क्र.३५४साठी केला आहे. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वितरण वाहिनीचा विस्तार असलेने अर्जदाराचा अर्ज प्राप्त झालेपासून १ महिन्याचे आंत वि.प.ने चलन देणे गरजेचे आहे. त्यानंतर तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ८.१२.२००९ रोजी दाखल केला.अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ११२५४ दि. १६.१२.२००९ नुसार भरपाईबाबत निर्देश केले आहेत की, जर कृती मानके साध्य करण्यात वितरण कंपनीला अपयश आल्यास तक्रारदारास भरपाई द्यावी लागेल.

प्रस्तुतची तक्रार दिनांक ११.२.२०१० रोजी दाखल केली आहे. अर्ज दिलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष चलन मिळेपर्यंत झालेल्या विलंबाबाबत कृती मानकानुसार भरपाई मिळावी अशी तक्रारदाराने मागणी केली आहे. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे.

वि.प.ने आपल्या दि. ३१.३.२०१० चा लेखी अहवालात जो दि. ७.४.२०१० ला दाखल केला आहे, तक्रारदाराचा अर्ज दि. ८.१२.२००९ रोजी मिळाल्याचे मान्य केले आहे व त्यांस दि. १३.१.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे.

मंचासमोर तक्रारीची सुनावणी दि. ७.४.२०१० रोजी घेतली असता प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग हजर. वि.प.तर्फे सांगण्यात आले की, चलन देण्यास ५ दिवसांचा अल्पसा विलंब झाला आहे, तसेच चलनाप्रमाणे ग्राहकाने पैंसे भरले नाहीत त्यामुळे नुकसान भरपाई देण्यात येवू नये. तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे यांनी विलंब झाला आहे त्यामुळे भरपाई देणेस वितरण कंपनी जबाबदार आहे असे सांगितले.

उभयबाजूंचे लेखी व तोंडी कथनानुसार, तक्रारदार यांनी शेतीपंप वीज कनेक्शनसाठी वि.प.कडे दि. ८.१२.२००९ रोजी अर्ज केल्याचे स्पष्ट होते. अंतर्गत कक्षाचा आदेश दि. १६.१२.२००९ ला पारित झाला आहे. तक्रारदार यांना दि. १३.१.२०१० ला चलन दिले आहे. ५ दिवसांचा म्हणजे १ आठवड्याचा विलंब झाला असल्याने रु. १००/- इतकी भरपाई देणेस वि. प. जबाबदार आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे. वितरण कंपनीने तक्रारदार यांस दिनांक ८.१.२०१० ते १३.१.२०१० या विलंबाच्या १ आठवड्याच्या कालावधीसाठी रु. १००/- भरपाई द्यावी.

२) सदर रकमेचे बिलामध्ये समायोजन करण्यात यावे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ३.५.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :